**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः 26.05.2024** **वारः रविवार**

---

१.लोकसभेच्या सहाव्या टप्प्यासाठी 58 मतदारसंघात शांततेत मतदान, ६१ पूर्णांक ७६ टक्के मतदानाचा प्राथमिक अंदाज,
२.पुण्यात खेलो इंडिया वसतिगृह आणि मुलींच्या क्रीडा तुकडीचं लष्कर प्रमुखांच्या हस्ते काल उद्घाटन
३.ओलिसांच्या सुटकेसंदर्भात इस्रायल-हमासच्या नव्यानं चर्चेसाठी इस्रायलची मान्यता
४.कान चित्रपट महोत्सवात ऑल वि इमॅजिन इज लाईट चित्रपटाला ग्रां प्री पुरस्कार आणि
५.विविध ठिकाणी लागलेल्या आगी आणि अपघातात काल ४८ जणांचा मृत्यू

**लोकसभा६वाटप्पा**

लोकसभेच्या सहाव्या टप्प्यासाठी काल रात्री साडेअकरा पर्यंत हाती आलेल्या आकडेवारीनुसार 61 पूर्णांक 76 टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. ५८ लोकसभा मतदारसंघांसाठी सहा राज्य आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये शांततेत मतदान पार पडलं. या टप्प्यात बिहार लोकसभेच्या 8 जागांसाठी, हरियाणातल्या सर्व 10, झारखंडमधील 4, दिल्लीतील सर्व 7, ओडिशातल्या 6 ,उत्तर प्रदेशातील 14, पश्चिम बंगालमधील 8 जागा आणि जम्मू- काश्मीर मधील एका जागेसाठी - मतदान झालं. जम्मू-काश्मिरमधल्या अनंतनाग-राजौरी मतदार संघात सर्वाधिक ५४ टक्के मतदानाची नोंद झाली, जे गेल्या पस्तीस वर्षांतलं सर्वोच्च मतदान आहे. बिहारमध्ये ५५ टक्के, हरियाणात ६२ टक्के, झारखंडमध्ये ६४ टक्के, दिल्लीत ५८ टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे. ओडिशामध्ये७१ टक्के तर उत्तरप्रदेशात ५४ टक्के आणि पश्चिम बंगालमध्ये ८० टक्के मतदान झालं.
या टप्पात ८८९ उमेदवारांचं भवितव्य मतपेटीत बंद झालं आहे. त्यात ज्येष्ठ भाजप नेते धर्मेंद्र प्रधान, मनेका गांधी, मनोहरलाल खट्टर आणि मनोज तिवारी तसंच कॉंग्रेस नेते दीपेंदर सिंग हुडा, कुमारी सैलजा, राज बब्बर आणि कन्हैय्या कुमार तर समाजवादी पक्षाचे नेते धर्मेंद्र यादव आणि पीडीपी प्रमुख मेहबुबा मुफ्ती यांचा समावेश आहे.

या लोकसभा जागांसमवेत ओडिशातल्या विधानसभेच्या तिसऱ्या टप्प्यात ४२ जागांसाठी मतदान पार पडलं. या टप्प्यात ७० टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. तीव्र उन्हाळ्यातही देशात नागरिक मोठ्या संख्येनं मतदानासाठी बाहेर पडल्याचं चित्र काल पहायला मिळालं. सहाव्या टप्प्याअखेर देशातल्या २८ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या ४शे८६ लोकसभा मतदारसंघासाठी मतदान पूर्ण झाल्याचं

आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे. तर अरूणाचल प्रदेश, सिक्कीम, आंध्र प्रदेश आणि ओडिशातल्या १०५ विधानसभा जागांसाठी मतदान झालं. लोकसभेच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठीच्या प्रचाराची रंगत वाढली आहे. येत्या एक जूनला ५७ लोकसभा मतदारसंघांसाठी शेवटच्या टप्प्याचे मतदान होणार आहे. तर चार जूनला मतमोजणी होणार आहे.

**<u>मोदीमुलाखत</u>**

निवडणूक हा लोकशाहीतला सर्वात मोठा उत्सव असून ती भावी पिढीच्या मनात लोकशाहीची मूल्य रुजवण्याची संधीही असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल डीडी न्यूजला दिलेल्या विशेष मुलाखतीत केलं. प्रत्येक पक्षानं आपल्या कामाचा लेखाजोखा जनतेसमोर मांडला पाहिजे असंही ते म्हणाले. लोकसभा निवडणूक म्हणजे लोकांना भेटण्याची संधी देणारी मोहिम असं मी समजतो असं सांगून, कोणत्याही प्रकारच्या समीक्षेकडे गांभीर्याने पाहात असल्याचं प्रतिपादन मोदी यांनी यावेळी केलं.

**<u>एनडीएकमांडट</u>**

पुण्यातल्या राष्ट्रीय संरक्षण अकादमी अर्थात एनडीएच्या कमांडटपदाची सूत्र व्हाईस ॲडमिरल गुरचरण सिंग यांनी मावळते कमांडट व्हाईस ॲडमिरल अजय कोच्चर यांच्याकडून काल स्विकारली. एनडीएतून उत्तीर्ण झालेले सिंग यांची 1990 साली भारतीय नौदलात नियुक्ती झाली होती. त्यांना समुद्रात आणि किनारी दोन्ही ठिकाणी अनेक पदांवर काम केलं आहे. तोफखाना आणि क्षेपणास्त्र याचे तज्ज्ञ म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांनी भारतीय नौदलातल्या रणजित आणि प्रहार या जहाजांवर सेवा बजावली आहे. भारतीय बनावटीच्या आयएनएस ब्रह्मपुत्रा, आयएनएस शिवालिक आणि आयएनएस कोची या तीन युद्धनौकांवर सेवा बजावण्याचा सन्मान त्यांना प्राप्त झाला आहे.

**<u>गर्ल्स कंपनी</u>**

पुण्यातल्या लष्करी क्रीडा संस्था आणि मुलींच्या क्रीडा तुकडीचं आणि खेलो इंडिया वसतिगृहाचं उद्घाटन काल लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी क्रीडा प्राधिकरणाचे महासंचालक संदीप प्रधान आणि भारतीय ॲथलेटिक्स महासंघाच्या उपाध्यक्ष अंजू बॉबी जॉर्ज उपस्थित होते. युवा लष्करी क्रीडा संस्थेत मध्ये समाविष्ट या उपक्रमाला व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाकडून निधी सहाय्य देण्यात आलं आहे. खेलो इंडियाच्या खेळाडूंची राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावरची कामगिरी उंचावण्याच्या दृष्टीनं जागतिक दर्जाच्या सुविधा आणि प्रशिक्षण संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश यामागे आहे. याला पूरक म्हणून मुलींची लष्करी क्रीडा तुकडी स्थापन करण्यात आली आहे. ही तुकडी मुष्टीयुद्ध, भारत्तोलन, तिरंदाजी आणि ॲथलेटिक्स या प्रमुख क्रीडा प्रकारांसाठी आणि भारतीय महिलांच्या क्रीडा प्रतिभेच्या संगोपनासाठी समर्पित असेल. या तुकडीसाठी हजारहून अधिक तरुण मुलींनी राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा चाचण्यांमध्ये सहभाग घेतला. त्यातून २४ उत्कृष्ट खेळाडू मुलींची निवड करण्यात आली आहे.

**<u>इस्रायलहमासबंदी</u>**

इस्रायलनं इजिप्त, कतार आणि अमेरिकेच्या मध्यस्थीनं ओलिसांच्या सुटकेसंदर्भात हमासशी पुढील आठवड्यात नव्यानं चर्चा करण्यास मान्यता दिली असल्याचं इस्रायलच्या सरकारी दूरचित्रवाणी वाहिनीनं म्हटलं आहे. वाहिनीने दिलेल्या बातमीनुसार, काल पॅरीस इथं झालेल्या चर्चेत इस्रायलच्या मोसाद गुप्तचर यंत्रणेचे प्रमुख डेविड बार्निया यांनी इस्रायल युद्ध मंत्रिमंडळाच्या मान्यतेनं याबाबतचा नवीन प्रस्ताव अमेरिकेच्या केंद्रीय गुप्तचर यंत्रणा आणि कतारचे पंतप्रधान शेख मोहम्मद बिन अब्दुलरहमान बिन जास्सिम अल थानी यांच्यासमोर सादर केला. बर्निया यांच्या पॅरीस बैठकीतल्या उपस्थितीला इस्रायल सरकारच्या वतीनं दुजोरा देण्यात आला. इस्रायलच्या सरकारी वाहिनीने दिलेल्या बातमीनुसार, गेल्या वाटाघाटीत ऱखडलेल्या वादग्रस्त विषयांवर बर्न्स यांनी संभाव्य उपाय सुचवल्याचं म्हटलं आहे. तसंच अमेरिकेच्या सहभागासह आगामी चर्चेचं नेतृत्व इजिप्त आणि कतार करतील. या महिन्याच्या सुरुवातीला गाझा पट्टीत झालेल्या युद्धविरामाच्या वाटाघाटी विफल झाल्या होत्या.

**<u>कपाडीया-कान</u>**

चित्रपट निर्मात्या पायल कपाडीया यांच्या ऑल वि इमॅजिन इज लाईट या चित्रपटाला कान चित्रपट महोत्सवात ग्रां प्री पुरस्कार मिळाला असून हा पुरस्कार मिळवणाऱ्या त्या पहिल्या निर्मात्या ठरल्या आहेत. या सोहोळ्यातील हा दुसरा सर्वात प्रतिष्ठेचा पुरस्कार समजला जातो. मानाचा Palme d'Or पुरस्कार अमेरिकी दिग्दर्शक सीन बेकर यांच्या अनोरा चित्रपटाला मिळाला. गेल्या तीस वर्षात या सोहोळ्याच्या मुख्य स्पर्धेत दाखवण्यात आलेला पायल कपाडिया यांचा चित्रपट दोन बाबतीत महत्वाचा ठरला. गेल्या तीस वर्षातील तो पहिला भारतीय चित्रपट आहे तर भारतीय महिला दिग्दर्शकाचा पहिलाच चित्रपट ठरला.

**<u>चक्रीवादळ</u>**

हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार बंगालच्या उपसागरावरील रेमल चक्रीवादळ पश्चिम बंगालच्या समुद्री बेटांच्या दक्षिणपूर्वेस २९० किलोमीटरवर आणि पश्चिम बंगालच्या पुर्वेला ३२० किलोमीटरवर आहे. येत्या सहा तासात त्याचं तीव्र चक्री वादळात रुपांतरीत होईल आणि बांग्लादेश तसंच पश्चिम बंगालच्या किनारी प्रदेशात आज मध्यरात्री पुढे सरकेल.

**<u>सिमरनशर्मा</u>**

जपानमधील कोबे इथं झालेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेमध्ये भारताच्या सिमरन शर्मानं आपली सर्वोत्तम वेळ नोंदवत महिलांच्या 200 मीटर धावण्याच्या स्पर्धेत  सुवर्णपदक पटकावलं आहे. भारतानं जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सहा सुवर्ण पदकांसह एकंदर 17 पदकांची कमाई करत सहावं स्थान मिळवलं आहे.

**<u>राजकोटआग</u>**

गुजरातमध्ये राजकोट शहरातल्या नाना मावा रस्त्यावरील टीआरपी गेम झोन मध्ये काल संध्याकाळी लागलेल्या आगीत २७ लोकांचा मृत्यू झाला आहे, त्यात ९ मुलांचा समावेश आहे. उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभुमीवर गेमिंग झोनमध्ये पालक मुलांची गर्दी होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्र्यांकडून घटनेची माहिती घेतली असून सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

**<u>दिल्लीआग</u>**

दिल्लीतील विवेक विहार भागात एका पाळणाघराला काल रात्री लागलेल्या मोठ्या आगीत ६ नवजात बालकांचा मृत्यू झाला. बारा बालकांना बाहेर काढण्यात यश आलं असून, ६ गंभीर जखमी बालकांना दिल्लीतील ॲडवान्स नर्सिंग होम मध्ये दाखल करण्यात आलं आहे. पाळणाघराचे संचालक आणि कर्मचारी फरार झाले असून आगीचं कारण अद्याप समजलेलं नाही.

**<u>उप्र-अपघात</u>**

उत्तर प्रदेशातील शाहजहानपूर मध्ये काल झालेल्या एका रस्ते अपघातात ११ लोकांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाले आहेत. रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या बसला एका खडीने भरलेल्या ट्रकनं धडक दिल्यामुळे हा अपघात घडला

**<u>काश्मीर</u>**

दक्षिण काश्मीर मधील  कुलगाम जिल्ह्यातील निपोरा भागात काल दुपारी झालेल्या एका रस्ते अपघातात पंजाबच्या चार पर्यटकांचा मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले.जखमींना तातडीने अनंतनागच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात हलवण्यात आलं.

या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.